**अर्जदाराचा पुढील सरतपास शपथेवर वकिल श्री. पी.डी.शर्मा यांच्याद्वारे –**

मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सदरचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. ते तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशानी क्रमांक १७ देण्यात येत आहे. मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक १ वर माझे सुजलेल्या चहे–याचे फोटो दाखल केले आहे. सदरचा फोटो मीच काढला होता. आता मला सदरचा फोटो दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यास **निशानी क्रमांक २०** देण्यात येत आहे.

मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक २ वर माझी पॅथोलॉजी रिपोर्टची मुळ प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची रिपोर्ट दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर संबधित डॉक्टरांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर रिपोर्टला **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक ३ वर माझ्या पतीला दिनांक ४.८.२०२० रोजी पाठविलेल्या नोटीसची ऑफीस प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर माझ्या वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. डी एच शर्मा माझे वकिल असल्यामुळे मी त्यांची सही ओळखते. सदर नोटीसला **निशानी क्रमांक २१** देण्यात येत आहे.

मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक ४ वर सदर नोटीस सामनेवाल्याला पाठविल्याबद्दलची पोस्टल पावती ट्रॅकींग रिपोर्टसोबत दाखल केलेली आहे. सदरचा ट्रॅकींग रिपोर्ट मी इंटरनेटवरुन काढुन त्याचे प्रिन्टआउट न्यायालयात सादर केले आहे. याकरिता मी भारतीय पुरावा कायद्याचे कलम ६५–ब प्रमाणे प्रमाणपत्र जोडलेले आहे. आता मला सदरची पोस्टल पावती, ट्रॅकींग रिपोर्ट व प्रमाणपत्र दाखविण्यात आले. ते तेच असुन प्रमाणपत्रावर माझी सही आहे. तयातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर तिनही दस्तांना एकत्रीतरित्या **निशानी क्रमांक २२** देण्यात येत आहे.

मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक ५ वर मी दिनांक १३.९.२०२० रोजी माझे पतीने माझे घरी येवुन तोडफोड केल्याबद्दलचे छायाचित्र दाखल केले आहे. सदरचे छायाचित्र माझ्या भावाने काढले होते. आता मला सदरचे छायाचित्र दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यांना **आर्टिकल ब** देण्यात येत आहे.

मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक ६ वर

माझ्या फोनमध्ये दिनांक १३.९.२०२० रोजीच्या कॉल डिटेल्सच्या स्क्रीन शॉटचा प्रिन्टआउट भारतीय पुरावा अधिनियमचे कलम ६५–ब अनुषंगाने प्रमाणपत्रासोबत दाखल केलेले आहे. आता मला सदरचे प्रिन्टआउट व प्रमाणपत्र दाखविण्यात आले. ते तेच असुन प्रमाणपत्रावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर दोन्ही दस्तांना एकत्रीतरित्या **निशानी क्रमांक २३** देण्यात येत आहे.

मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक ७ वर मी माझ्या वडीलांनी दिनांक १३.९.२०२० रोजी मौदा पोलीस स्टेशन येथे सामनेवाल्याविरुध्द दिलेल्या तक्रारीची छायांकित प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर माझ्या वडीलांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर तक्रारीला **आर्टिकल क** देण्यात येत आहे.

मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक ८ वर पोलीसांनी माझ्या वडीलांनी दिलेल्या तक्रारीवर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे माझ्या वडीलांनी पोलीस अधीक्षक, नागपुर यांच्याकडे दिलेल्या तक्रारीची ऑफीस प्रत दाखल केली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यावर प्राप्त केले म्हणुन पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या कर्मचा–याची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर तक्रारीला **निशानी क्रमांक २४** देण्यात येत आहे.

मी निशानी क्रमांक १९ वरील कागदपत्रांच्या यादीवरील अनुक्रमांक ९ वर सामनेवाल्याविरुध्द नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवालाची छायांकित प्रत लावलेली आहे. आता मला सदरची प्रत दाखविण्यात आली. ती तिच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर छायांकित प्रत ला **आर्टिकल ड** देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

**सामनेवाले व त्यांचे वकिल गैरहजर असल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.
दिनांक २०.०७.२०२२

(ए.बी. कादियन )
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा

नि.क्र. १७ च्या पुढे